लोकसत्ता

गुरुवार, १५ जानेवारी २००९

# महिंद्रा ट्रॅक्टर्सचे साक्षरता प्रसारासाठी 'प्लॅनेटरीड'ला साहाय्य

**व्यापार प्रतिनिधी:** महिंद्रा फार्म इक्विपमेंट विभागाने आपल्या सामाजिक बांधिलकी धोरणा काली पॅनेटरीड या अशासकीय संस्थेला त्यांच्या साक्षरता प्रसार कार्याला साहाय्य करण्याचे जाहीर केले आहे. हिंदी चित्रपटातील गाण्यांना उपशीर्षके देण्याचा (सेम लेंग्वेज सब टायटलिंग) एक प्रकल्प या संस्थेने प्रथमच साक्षर होणारांसाठी राबविण्याचे ठरवलेले आहे. कंपनी या कार्याला जानेवारी ते जून २००९ या कालखंडात प्रायोजक या नात्याने रु. १० लाख देणार आहे. दूरदर्शन हिंदी चित्रपट गीतांचा रंगोली नामक सप्ताहिक कार्यक्रम करते.

ही घोषणा करते समयी फार्म इक्विपमेंट विभागाचे प्रेसिडेंट अंजनिकुमार चौधरी म्हणाले की शिक्षणातून सदासर्वकाळ जीवन समृद्ध होत असते. सेम लॅंग्वेज सब - टायटलिंग (एसएलएस) हे साक्षरता प्रसाराचे अभिनव साधन झाले आणि त्यासाठी प्लॅनेटरीडला करत असलेल्या आमच्या मदतीने आम्ही देशातील सर्व स्तरातील शिक्षणाचा दर्जा उंचावत आहोत असे ते म्हणाले. ■